यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालय, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी.**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,**
गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
शासन निर्णय क्रमांक पीजीए १२१३/प्र.क्र.९३/१३/शिक्षण-२
दिनांकः- २० ऑक्टोबर, २०१४

**वाचा:-** १) शासनाचे समक्रमांकित ना-हरकत प्रमाणपत्र, दिनांक १८.०४.२०१३.

२) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुंटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांचे पत्र क्र.आर. १३०११/२५/२०१३-ईपी (आयएम-१), दिनांक १०.१०.२०१४.

**प्रस्तावना:-** यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालय, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या संस्थेस बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्यास संदर्भ क्र.(१) अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र.(२) अन्वये केंद्र शासनाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांनी सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ८० वरुन १०० एवढी वाढ करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून उक्त पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. (२) अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालय, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या संस्थेस सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ८० वरुन १०० एवढी वाढ करण्यास खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

**अटी व शर्ती:-**

१) या आयुर्वेद महाविद्यालयातील बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार १०० एवढी राहील.
२) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.
३) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.
४) केंद्र शासन, भारतीय चिकीत्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

९) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१०) केंद्र शासनाने दिलेली सदर मान्यता ही उक्त अभ्यासक्रमास सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांची तुकडी सदर अभ्यासक्रम पुर्ण करेपर्यंतच्या कालावधीकरीता असल्याने संस्थेने त्यानंतरचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाची तसेच त्या आधारे राज्य शासनाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३. सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भीत केंद्र शासनाच्या दिनांक १०.१०.२०१४ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अंजली वि. अंभिरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.राज्यपालांचे सल्लागार, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
प्राचार्य, यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालय, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट मेडिकल ॲण्ड डेंटल कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री.जी.हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई-०१
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
निवडनस्ती (शिक्षण-२)

Seen
Xerox for
① Hble Secretary
Administrator
21.10.14

YASHWANT AYURVEDIC COLLEGE, KODOLI.
INWARD 740
FILE NO ..........
DATE 22/10/14.

श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, कोल्हापूर.

पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ६५ वरुन ८० एवढी वाढ करण्यास परवानगी.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एएमसी-१००९/प्र.क्र.३०/०९/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २१ ऑक्टोबर, २०१०

वाचा:-१) शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र क्र.एएमसी-१००९/प्र.क्र.३०/०९/शिक्षण-२, दि.१५.४.२००९.

२) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुंटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांचे पत्र एफ.क्र.आर-१३०११/१४/२००९-ईपी, दि.०६.१०.२०१०.

प्रस्तावना:- श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, कोल्हापूर या संस्थेस पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ६५ वरुन ८० एवढी वाढ करण्यास संदर्भ क्र.(१) अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र.(२) अन्वये केंद्र शासनाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांनी सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ६५ वरुन ८० एवढी वाढ करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ६५ वरुन ८० एवढी वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. (२) अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, कोल्हापूर या संस्थेस सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ६५ वरुन ८० एवढी वाढ करण्यास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

अटी व शर्ती:-

१) या आयुर्वेद महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार ८० एवढी राहील.

२) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) केंद्र शासन, केंद्रिय भारतीय चिकीत्सा परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

९) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भीत दि. ०६.१०.२०१० च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वि.ला.ढोले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई.
प्राचार्य, श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, कोल्हापूर
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट मेडिकल ॲण्ड डेंटल कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री.जी.हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई-०१
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
निवडनस्ती (शिक्षण-२)

या संस्थेचे यशवंत आयुर्वेदिक महाविद्याल
कोडोली.

श्री यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, कोडोली ता. पन्हाळा
जि. कोल्हापूर या संस्थेत "कायम विना अनुदान
तत्वावर" खाजगी आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्यास
परवानगी व त्याबाबतच्या अटी व शर्ती.

---

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.
शासन निर्णय क्रमांक: एडीआर/१५८९/२२४७/एमईडी-७.
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: २: सप्टेंबर: १९८९.

---

शासन निर्णय:--महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय शिक्षणांच्या सुविधा जास्त प्रमाणांत उपलब्ध व्हाव्यात अशी सततची मागणी वाढत आहे. तसेच वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी या राज्यातील विद्यार्थी अहमहमिकेने पुढे येत आहेत. तसेच उच्च गुण प्राप्त विद्यार्थ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश न मिळाल्यामुळे नैराश्याची भावना येण्याची शक्यता आहे. त्यामुळे जनतेची मागणी व कांही अंशी गरज भागविण्यासाठी "कायम विना अनुदान तत्वावर" खाजगी आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या संस्थेने शासनाकडे कायम विना अनुदान तत्वावर आयुर्वेदिक महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी मागितली होती व ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. तथापि विना अनुदान तत्वावर आयुर्वेदिक/ युनानी कॉलेज सुरु करण्यात येवून नंतर अनुदान मागण्यांत येते असाही शासनाचा अनुभव आहे. तथापी श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाने शासनाकडे अनुदान मागितले जाणार नाही अशी हमी दिल्याकारणाने, व दिलेल्या हमीनुसार संस्था शासनाशी व्यवहार करेल अशी खात्री झाल्यामुळे, शासनाने श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळास कोडोली, ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथे कायम विना अनुदान तत्वावर आयुर्वेदिक कॉलेज सुरु करण्याची तात्पुरती [प्रोव्हीजिनल] परवानगी शैक्षणिक वर्ष १९८९-९० पासून देण्याचा निर्णय घेतला आहे.

४. तरी या निर्णयाव्दारे शासन श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर या संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर कोडोली, ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथे सन १९८९-९० या शैक्षणिक वर्षापासून आयुर्वेदिक महाविद्यालय सुरु करण्याची खालील अटींच्या आधीन राहून परवानगी देत आहे.

५. सदर महाविद्यालयासाठी खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील:-

१] आयुर्वेदिक महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ६० इतकी राहील.

२] वार्षिक शैक्षणिक शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यामागे रूपये १५,०००/- पेक्षा जास्त आकारण्यात येऊ नये.

३] मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जागा राखून ठेवण्याबाबत संस्थेच्या प्रवेशाबद्दल कोणताही निर्बंध संस्थेवर असणार नाही.

४] प्रवेश क्षमतेपैकी १० टक्के जागा संस्थेने भराव्यात व उरलेल्या ९० टक्के जागा सोबत जोडण्यांत आलेल्या परिशिष्ट "अ" प्रमाणे भराव्यात.

५] एकूण प्रवेश संख्येपैकी १० टक्के जागा व्यवस्थापनाच्या इच्छेनुसार भराव्यात. व या जागांसाठी विद्यार्थ्याने किमान ५० टक्के गुण मिळविलेले हवे. इंग्रजी विषयात व भौतिकशास्त्र [फिजिक्स] रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयात मिळून ५०% पेक्षा कमी गुण असू नयेत. तसेच विद्यार्थी एकाच प्रयत्नात उत्तीर्ण झालेला असावा. उर्वरित जागा सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे भराव्यात.

६] साधारणपणे आयुर्वेद महाविद्यालयांच्या प्रवेशासंबंधी शासनाचे जे प्रवेश नियम आहेत, त्याच धर्तीवर खाजगी संस्थांना सुयोग्य ठरतील अशा तऱ्हेने विहित केले जावेत.

७] विद्यार्थ्यांचा निवड करण्यासाठी संस्थेने एक निवड समिती नेमावी व त्या शासनाचा प्रतिनिधी म्हणून सहाय्यक आयुर्वेद संचालक, पुणे हे राहतील.

८] आयुर्वेदिक महाविद्यालयांच्या शिक्षणाचा दर्जा हा भारतीय चिकित्सा परि नवी दिल्ली, केंद्र शासन व राज्य यांच्या मानदंडकाप्रमाणे असणे अत्यंत आवश्यक आहे. व हे दंडक सव्वा वर्षाच्या आत संस्थेने पूर्ण करणे आवश्यक आहे. म्हणून संबंधित संस्थेवर खालील गोष्टी बंधनकारक राहतील. [१५ महिन्याच्या आत]

अ] एका विद्यार्थ्याला २ खाटा याप्रमाणानुसार आयुर्वेदिक महाविद्यालयांना संलग्न असणारी जी रूग्णालये आहेत त्यात १२० खाटांची यथायोग्य व कायम स्वरूपात व्यवस्था केली पाहिजे. ही व्यवस्था बी.ए.एम.एस. च्या दुसऱ्या वर्गाचे शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या आधी ४ महिन्यांच्या आत पूर्ण करून शासन त्याप्रमाणे कळवावे.

ब] शासनाची एक उच्चस्तरीय समिती या वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षणाच दर्जा व प्रगती योग्यरितीने होत आहे किंवा नाही या गोष्टींवर लक्ष ठेवून शासनास योग्य त्या शिफारशी करील.

क] वैद्यकीय शिक्षणासंबंधी अस्तित्वात असलेले व पुढे अस्तित्वात येणारे जे काही नियम असतील ते पाळणे संस्थेवर बंधनकारक राहील.

९] या महाविद्यालयांच्या प्रशासनावर व कार्यक्षमतेसंबंधी शासनाचे नियंत्रण असण्यासाठी शासनाचा एक प्रतिनिधी संस्थेच्या कार्यकारी मंडळावर राहील.

१०] आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी अनुदानाची मागणी या संस्था शासनाकडे करणार नाहीत असे लेखी अभिवचन त्यांनी शासनास दिले पाहिजे.

११] उपरोक्त अट क्रमांक ४ संबंधीचे स्पष्टीकरण सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये पहावे.

वरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेने शासनाला लेखी लिहून देणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[signature]
[अ. दा. साने]
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव.

प्रति,

~~राज्यपालांचे सचिव.~~
मुख्य मंत्र्यांचे सचिव.
मुख्य सचिव.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
प्रशासक [सा. प्र.] आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई-४०००१८.
सहाय्यक संचालक, आयुर्वेद पुणे, नागपूर, मुंबई.
सचिव, विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय [ओरिजनल साईड] [पत्राव्दारे].
प्रबंधक, उच्च न्यायालय [ॲपिलेट साईड] [पत्राव्दारे].
महासंचालक, प्रसिध्दी व माहिती संचालनालय, मुंबई.
सर्व मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक.
मंत्रालयीन सर्व विभाग.
शिक्षण विभाग [ताशि १/व तांशि-३/दिशी-२] मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय, मुंबई.
शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांचे सर्व अधिष्ठाते.
श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, कोडोली, ता. पन्हाळा. जि. कोल्हापूर-४१६११४.
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर [पत्राव्दारे].
निवड नस्ती.

शिदि. २. ९. ८९.